पशुपालन

## महिलांचा सहभाग ठरतो महत्त्वाचा
# पशुसंगोपन म्हणजे शाश्वत रोजगाराचे साधन




**डॉ. स्मिता कोल्हे**
(मो.नं. ९९७०४२५३८९)
**डॉ. राहुल कोल्हे**
के.एन.पी. कॉलेज ऑफ
व्हेटरनरी सायन्स,
शिरवळ, जि. सातारा




> पशुपालन व्यवसाय करताना त्यातील विविध संधींबद्दल माहिती घेणे गरजेचे आहे. तसेच व्यवस्थापनातील बारकावे लक्षात घ्यावेत, आर्थिक ताळमेळ बसवावा, नोंदी ठेवाव्यात, योग्य बाजारपेठ शोधावी आणि प्रशिक्षण घ्यावे. नवे ज्ञान घेण्याची तयारी ठेवावी. योग्य व्यवस्थापन, चिकाटी आणि निर्णयक्षमता बाळगून अनुभवातून शिकावे. प्रयत्नपूर्वक व विचारपूर्वक काम करावे.

आज भारत देश दुग्धव्यवसायात अग्रेसर आहे. अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पशुपालन व्यवसाय स्वयंपूर्ण बनला आहे. भारतीय लोकसंख्येच्या ६० टक्के जनता ही ग्रामीण भागात राहाते. लोकांचा उदरनिर्वाह कृषी तसेच पशुपालन उद्योगांवर विसंबून आहे. यात पशुपालनामध्ये महिलांचा सहभाग प्रामुख्याने महत्त्वाचा आहे. महिला या घरचा कार्यभार सांभाळून जनावरांचे पालनपोषण करतात. त्या फक्त कष्ट करतात पण त्याचा योग्य तो मोबदला त्यांना मिळत नाही. आपण या व्यवसायाद्वारे उत्पन्न घेऊ शकतो, नफा मिळवू शकतो, स्वयंरोजगार मिळवू शकतो याची कित्येक महिलांना जाणीवच नाही. ग्रामीण महिला घरचा व्याप सांभाळण्याबरोबर जनावरांचे दिवसभराचे व्यवस्थापनही सांभाळत असतात. दिवसभर महिला जनावरांच्या व्यवस्थापनात गुंतलेल्या असतात, त्यामुळे त्यांना जनावरांच्या सवयी, आहार इत्यादींची माहिती असते. याशिवाय  महिलांकडे जन्मत:च काही गुण असतात. याच गुणांची गरज या व्यवसायात आहे. महिलांकडे काटकसर, कष्टाळूपणा, संगोपन कौशल्य, स्वच्छता, प्रेमळपणा, योग्य व्यवस्थापन, एकनिष्ठता, जिद्द, चिकाटी इत्यादी गुण निसर्गत: असतात. याचा उपयोग हा व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी करता येईल.

## शास्त्रीय पद्धतीने संगोपन गरजेचे

पशुपालन व्यवसायाचे अर्थशास्त्र हे सर्वस्वी जनावरांच्या व्यवस्थापन कौशल्यावर अवलंबून आहे. जनावरांचे शास्त्रीय पद्धतीने संगोपन केल्यास भरपूर फायदा होतो. प्रत्येकवेळी व्यावसायिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे असे नाही. व्यावसायिक दृष्टिकोनाबरोबरच जनावरांबद्दल आपुलकी, प्रेम, जिव्हाळा, संगोपनाची कला असणे आवश्यक आहे





आणि ही कला महिलांमध्ये उपजतच असते. स्त्री ही उत्तम व्यवस्थापक आहे आणि याच व्यवस्थापन कौशल्याचा वापर पशुपालनामध्ये महत्त्वाचा आहे. आपण पशुपालनामध्ये बरीच कामे करीत असतो परंतु ती पारंपरिक पद्धतीने. या पशुपालन व्यवसायाकडे रोजगाराच्या दृष्टिकोनातून बघतच नाही. समाजामध्ये आपले स्थान निर्माण करायचे असेल तर स्वत:च्या पायावर उभे राहायलाच हवे. रोजगार अर्थात नोकरीच नव्हे तर आपण स्वयंरोजगारातून सुद्धा समृद्धीकडे वाटचाल निश्चितच करू शकतो. यामुळे आर्थिकदृष्ट्या कुणावर अवलंबून रहावे लागत नाही. पशुपालन व्यवसायामध्ये विविध संधी आहेत. प्रथम आपण दुग्धव्यवसायाबद्दल बोलूया. दुग्धव्यवसाय हा उत्तम व्यवसाय आहे. कुठलाही व्यवसाय यशस्वी करायचा असेल तर तांत्रिक व शास्त्रीय दृष्टिकोनातून बघायला हवे. दुग्ध व्यवसायातील उपलब्ध संधी, पर्याय, उपजत कौशल्यांचा उपयोग करून याला शाश्वत उपजीविका निर्माण करण्याचे साधन निश्चितच बनवू शकू.

## शास्त्रीय प्रशिक्षण घ्यायला हवे

व्यवसाय सुरू करताना योग्य शास्त्रीय प्रशिक्षण हे घेतलेच पाहिजे. प्रशिक्षणामुळे आपल्याला या व्यवसायाबद्दल समग्र माहिती मिळते. योग्य बाजारपेठ लक्षात घेऊनच व्यवसायाची सुरुवात करावी. दुग्ध व्यवसायात सहकाराचे तत्त्व अत्यंत उपयोगी आहे. अनेक ठिकाणी यशस्वी सहकारी धोरणांमुळे हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरला आहे. दुग्ध व्यवसायामध्ये महिलांनी एकत्र येऊन विविध बचतगटांद्वारे नियोजनबद्ध शास्त्रीय दृष्टिकोनातून, श्रमशक्तीने, चिकाटीने व्यवसाय

केला तर यश नक्कीच मिळते. दुग्ध व्यवसाय म्हणजे नुसतेच गाई, म्हशी पाळून दूध उत्पादन करणे एवढेच नव्हे, तर आजकाल इतरही अनेक पर्याय आहेत. दूध संकलन करून दुधाचे पदार्थ बनविणे हा सुद्धा महिलांसाठी उत्कृष्ट पर्याय आहे. महिला बचतगटांद्वारे विविध पदार्थ तयार करून स्वत:च्या बचतगटांद्वारे विक्री करून नफा मिळवू शकतात. दूध विक्रीपेक्षा दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, विक्री यामध्ये जास्त नफा मिळतो. आज ठिकठिकाणी दूध, दुग्धजन्य पदार्थांच्या भेसळीबाबत आपण ऐकतो. जर आपण गुणवत्तापूर्ण दुग्धजन्य पदार्थ निर्मिती केली तर आर्थिकदृष्ट्या आपल्याला फायदाच होईल. याचबरोबर गोमूत्र, गोवरी सुद्धा विकून नफा मिळविता येतो.

### कुक्कुटपालनही ठरते लाभदायक

आज जागतिक बाजारपेठेत भारताचे स्थान कुक्कुटपालनात महत्त्वाचे आहे. कुक्कुटमांस व अंडी यांची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे. महिलांना कुक्कुटपालनात सुद्धा संधी आहे. कुक्कुटपालन दोन प्रकारे करता येते. व्यावसायिक आणि घरगुती. आपण अंडी उत्पादनासाठी व्यवसाय करायचा की मांस उत्पादनासाठी हे अगोदर ठरवून घ्यावे. आज देशी कोंबडीचे मांस व अंडी यांना प्रचंड मागणी आहे. गावरान कुक्कुटपालन अगदी कमी भांडवलात घरच्या परसबागेत करता येते. परसबागेतील कुक्कुटपालन हे कमी भांडवलात मोठा नफा असा व्यवसाय आहे. ग्रामीण महिला घरचा व्याप सांभाळून हा व्यवसाय सहजपणे करू शकतात. शेळीपालन सुद्धा महिला करतात. यात मटणासाठी शेळीपालन फायद्याचे आहे. आज चाऱ्याची टंचाई आहे. ज्यांच्याकडे शेती, जमीन भरपूर आहे ते चारा उत्पादन करून टंचाईगस्त भागात विक्री करू शकतात. पशुपालन





व्यवसाय करताना योग्य व्यवस्थापन, प्रशिक्षण, जनावरांच्या नोंदी ठेवणे, पारंपरिक पशुव्यवस्थापनातील दोष समजून घेणे, योग्य बाजारपेठ शोधणे, शास्त्रीय दृष्टिकोनातून पशुपालन व्यवसाय करणे इत्यादी बाबी आवर्जून कराव्यात.

### पशुपालन उद्योगात अनेक संधी

पशुपालन व्यवसायात आपल्याला भरपूर संधी आहेत. कुठला व्यवसाय करायचा याची निवड करायची असेल, तर योग्य बाजारपेठ शोधावी. आपल्या भागात कशाची गरज आहे व आपण आहे त्या परिस्थितीमध्ये काय करू शकतो हे जाणून घेऊन मग दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन, वराहपालन यापैकी कुठलाही व्यवसाय योग्य प्रशिक्षण घेऊन करावा. प्रशिक्षण घेतल्यामुळे पारंपरिक ज्ञानाला शास्त्रीय ज्ञानाची जोड मिळते. तसेच आपण व्यवसायाची सुरुवात कशी करावी, जनावरे कशी निवडावीत, व्यवस्थापन कसे करावे, आहार कसा द्यावा, विक्रीतून आर्थिक नफा- तोट्याच्या नोंदी कशा ठेवाव्यात इत्यादी बाबींची माहिती मिळते. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळते.

पशुपालन व्यवसाय करताना त्यातील विविध संधींबद्दल माहिती घेणे गरजेचे आहे. तसेच व्यवस्थापनातील बारकावे लक्षात घ्यावेत, आर्थिक ताळमेळ बसवावा, नोंदी ठेवाव्यात, योग्य बाजारपेठ शोधावी आणि प्रशिक्षण घ्यावे. नवे ज्ञान घेण्याची तयारी ठेवावी. योग्य व्यवस्थापन, चिकाटी आणि निर्णयक्षमता बाळगून अनुभवातून शिकावे. प्रयत्नपूर्वक व विचारपूर्वक काम करावे. यातूनच आत्मविश्वास निर्माण होतो. या व्यवसायातील उपलब्ध संधी, पर्याय, कौशल्यांचा उपयोग करून याला शाश्वत उपजीविका निर्माण करण्याचे साधन तुम्ही निश्चितच बनवू शकता. ■